दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com


सुविचार

कृती हीच सर्व यशाची पायाभूत किल्ली आहे.





कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 82 ■ सोमवार , 15 जून 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


# आर्थिक अधिकारांविना प्रशासक

## धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींचा कारभार ठप्प

**विकासकामांना ब्रेक, ग्रामपंचायती अडचणीत; न्यायालयीन आदेशामुळे निधी खर्चावर निर्बंध**

**रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छता कामे रखडली; ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची प्रतीक्षा कायम**

**सज्जन यादव । आरंभ मराठी**

धाराशिव - राज्य शासनाकडून मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर अधिसूचनेनुसार सरपंचांचीच 'प्रशासक' म्हणून नेमणूक करण्यात आली खरी, मात्र न्यायालयाने दिलेल्या एका आदेशामुळे या ग्रामपंचायतींना मोठे आर्थिक व्यवहार करता येत नसल्याचे समोर आले आहे. परिणामी धाराशिव जिल्ह्यातील तब्बल ४२८ ग्रामपंचायतींचा कारभार ठप्प झाला असून ग्रामीण विकासकामांना मोठा फटका बसत आहे. ग्रामपंचायतींच्या खात्यावर निधी उपलब्ध असतानाही १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर विकासकामे, अंतर्गत रस्त्यांची कामे, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता मोहीम, गटारी, सार्वजनिक सुविधा आणि इतर मूलभूत विकासकामे रखडली आहेत. गावांच्या विकासासाठी उपलब्ध निधी खर्च करता येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

नियोजनानुसार मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात पार पडणे अपेक्षित होते. मात्र विविध कारणांमुळे निवडणुका लांबणीवर पडल्या. त्यानंतर शासनाने विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले. परंतु आर्थिक अधिकारांवर निर्बंध आल्याने प्रशासक म्हणून पदावर असतानाही विकासकामे पुढे नेता येत नसल्याची खंत अनेक सरपंच व्यक्त करत आहेत. प्रशासक पदावर राहूनही अधिकार नसतील तर विकासकामे कशी होणार? त्यापेक्षा राजीनामा दिलेला बरा, अशी भावना अनेक प्रशासकांकडून व्यक्त होत आहे. सध्या प्रशासकांना केवळ वीज, पाणी आणि अत्यावश्यक सेवांसाठी मर्यादित खर्च करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. प्रशासक म्हणून पुनर्नियुक्ती झाल्यानंतर बराच काळ हा विषय न्यायालयात प्रलंबित राहिला असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. दरम्यान, प्रशासकीय अनास्था आणि कायदेशीर पेचप्रसंग यामुळे सरपंचांच्या हाती विकासासाठी आवश्यक अधिकार उरलेले नाहीत. या प्रकरणी ग्रामविकास विभागाने अद्याप ठोस भूमिका न घेतल्याने परिस्थिती 'जैसे थे' आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.




### बीडीओंना प्रशासकीय अधिकार देण्याची मागणी

या पार्श्वभूमीवर सरपंचांना प्रशासक म्हणून कायम ठेवून आर्थिक व्यवहारांचे अधिकार गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याकडे देण्यात यावेत किंवा विस्तार अधिकारी तसेच अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीत करण्यासाठी कायद्यात आवश्यक बदल करून राज्यपालांचा अध्यादेश काढावा आणि प्रशासकीय व आर्थिक अधिकार पुन्हा सरपंचांना द्यावेत, अशीही मागणी होत आहे.

### कंत्राटदारांची बिले थकल्याने गोंधळ

ग्रामपंचायतींच्या विकास कामांचे कंत्राट घेतलेल्या ठेकेदारांना देखील याचा फटका बसत आहे. काम पूर्ण झाल्यानंतरही त्यांना त्याचे पैसे मिळत नाहीत. प्रशासक असणाऱ्या सरपंचांना आर्थिक अधिकार नसल्यामुळे ते देयकांवर सह्या करत नाहीत. त्यामुळे ठेकेदार हे पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत चकरा मारत आहेत. यामुळे काही गावात वादावादीचे देखील प्रसंग घडत आहेत.

### ऑगस्टनंतर निवडणुकांची शक्यता

धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित आहेत. मागील वर्षी सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत पार पडली होती. त्यानंतर दिनांक ११ व १२ जून रोजी प्रभागनिहाय आरक्षण सोडतही जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक विभागाला मतदार यादी अद्ययावत करणे, प्रभागनिहाय प्रक्रिया पूर्ण करणे आणि निवडणूक यंत्रणा उभी करण्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे १५ ऑगस्टनंतर धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ग्रामविकासावर थेट परिणाम

आर्थिक अधिकार नसल्यामुळे ग्रामपंचायतींतील विविध विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. पाणीपुरवठा योजनांची देखभाल, नवीन पाईपलाईन टाकणे, रस्ते दुरुस्ती, स्वच्छता कामे, सार्वजनिक बांधकामे, एलईडी दिवे, स्मशानभूमी विकास, जलसंधारण आणि इतर स्थानिक पातळीवरील कामांवर याचा परिणाम होत आहे. विशेष म्हणजे, यावर्षी मान्सून उशिरा दाखल झाल्याने अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहिरींची दुरुस्ती, मोटार दुरुस्ती किंवा इतर उपाययोजना करण्यासाठीही आर्थिक मंजुरीची आवश्यकता असते. मात्र आर्थिक अधिकार नसल्याने प्रशासकांना तातडीचे निर्णय घेता येत नाहीत.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये आज नव्या शैक्षणिक वर्षाचा होणार जल्लोष

## विद्यार्थ्यांचे होणार उत्साहात स्वागत

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये आज नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात होत असून विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. जिल्हास्तरापासून तालुकास्तरापर्यंतचे अधिकारी प्रत्यक्ष शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार असल्याने यंदाचा शाळेचा पहिला दिवस विशेष ठरणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने शाळा प्रवेशोत्सवाला उत्सवी स्वरूप देण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टाळ्यांच्या गजरात आणि विविध उपक्रमांद्वारे स्वागत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत आकर्षण निर्माण करण्यासाठी आणि शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या २७ विभाग प्रमुखांना विविध शाळा दत्तक देण्यात आल्या आहेत. हे विभाग प्रमुख संबंधित शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार असून शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेसह भौतिक सुविधांच्या विकासासाठीही पुढाकार घेणार आहेत. दत्तक शाळा उपक्रमामुळे शाळांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. शाळा प्रवेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी आणि रविवारी जिल्ह्यातील शाळांमध्ये स्वच्छता, सजावट आणि विविध स्वागत उपक्रमांची तयारी करण्यात आली. अनेक शाळांमध्ये रंगीबेरंगी फलक, फुगे आणि आकर्षक सजावट करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. काही गावांमध्ये नवागत विद्यार्थ्यांची बैलगाडी किंवा ट्रॅक्टरमधून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर काही शाळांमध्ये पारंपरिक पद्धतीने पाऊलकुंकू घेऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही शाळा प्रवेशोत्सवाला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिक्षण विभागाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आत्मीयता निर्माण होण्याबरोबरच शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासही मदत होणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हाभरातील जिल्हा परिषद शाळा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने पुन्हा एकदा गजबजून जाणार आहेत.

# वाहतूक नियमभंगावर एका दिवसात 476 कारवाया, 4.12 लाखांचा दंड वसूल

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकांनी शुक्रवारी (दि.13) विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण 476 कारवाया करण्यात आल्या असून, त्यांच्याकडून 4 लाख 12 हजार 400 रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे. वाहतूक व्यवस्थेत शिस्त निर्माण करणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता वाढविणे या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. शहरातील प्रमुख चौक व गर्दीच्या भागांमध्ये पोलिसांनी वाहनांची कसून तपासणी केली. या मोहिमेदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्थानक परिसर, राजमाता जिजाऊ चौक, देशपांडे स्टँड तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. हेल्मेट न वापरणे, सीटबेल्ट न लावणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, वाहन कागदपत्रे अपूर्ण असणे, चुकीच्या पद्धतीने वाहन पार्क करणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात आली.

# गट-ब पूर्व परीक्षा शांततेत; ५,२८० पैकी ४,३४७ उमेदवारांची उपस्थिती

**धाराशिवः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा रविवारी शांततेत आणि सुरळीत वातावरणात पार पडली. सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत एकाच सत्रात घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये १९ उपकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. परीक्षेसाठी एकूण ५ हजार २८० उमेदवारांची नोंदणी करण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ३४७ उमेदवार उपस्थित राहिले, तर ९३३ उमेदवार गैरहजर राहिले. परीक्षेच्या आयोजनासाठी श्रीपतराव भोसले हायस्कूल, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, छत्रपती शिवाजी हायस्कूल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, विद्यामाता हायस्कूल, तेरणा पब्लिक स्कूल, शासकीय तंत्रनिकेतन, अभिनव इंग्लिश स्कूल, ग्रीनलँड पब्लिक स्कूल, पोदार इंटरनॅशनल स्कूल, टीपीसीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भारत विद्यालय, के. टी. पाटील फार्मसी महाविद्यालय, बी. जे. शिंदे पॉलिटेक्निक कॉलेज आदी शैक्षणिक संस्थांमध्ये उपकेंद्रे निश्चित करण्यात आली होती.

# परंड्याचे सुपुत्र प्रा. डॉ. गजानन राशीनकर यांचा जगातील नामांकित शास्त्रज्ञांमध्ये समावेश

**आरंभ मराठी । परंडा**



परंडा येथील सुपुत्र, जागतिक दर्जाचे संशोधक आणि शिवाजी विद्यापीठातील प्रख्यात रसायनशास्त्रज्ञ प्रा. डॉ. गजानन शंकरराव राशीनकर यांचा जगातील टॉप पाच टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश झाल्याने परंडा शहरासह धाराशिव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल भाजप नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांचे अभिनंदन केले व पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. राशीनकर हे शिवाजी विद्यापीठात आघाडीचे संशोधक म्हणून कार्यरत असून संशोधन क्षेत्रात त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांचे वडील स्वर्गीय शंकरराव राशीनकर हे भूविकास बँकेचे सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक होते, तर मातोश्री स्वर्गीय उमाबाई वडेकर या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सेवानिवृत्त शिक्षिका होत्या. शिक्षण व संशोधनाची परंपरा लाभलेल्या कुटुंबातून आलेल्या प्रा. राशीनकर यांनी अनेक वेळा सेट-नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याचा विक्रमही आपल्या नावावर नोंदविला आहे. महिलांमधील स्तनाच्या कर्करोगावर प्रभावी उपचार पद्धती विकसित करण्यासाठी प्रा. डॉ. राशीनकर यांनी केलेले 'हायपरथर्मिया – चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती' हे संशोधन विशेष चर्चेत आहे. या संशोधनाला भारतासह युनायटेड किंगडम (यूके)मध्ये पेटंट प्राप्त झाले आहे. प्रा. डॉ. राशीनकर यांनी पर्यावरणपूरक पद्धतीने नवीन रासायनिक संयुगांची निर्मिती, कर्करोगविरोधी संयुगांचे संशोधन, तसेच जैविकदृष्ट्या सक्रिय रेणूंचे संश्लेषण या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे.

**आरंभ मराठी**

## आजपासून शासकीय दरात रोपे उपलब्ध होणार

# 'हरित धाराशिव'ची जय्यत तयारी ; सामाजिक वनीकरण विभागाकडून 35 लाखांहून अधिक रोपांची निर्मिती

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्याला अधिक हिरवेगार, पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने नेण्यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'हरित धाराशिव अभियान २०२६' ची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, या अभियानाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या सामाजिक वनीकरण विभागाने तब्बल ३५ लाखांहून अधिक दर्जेदार रोपांची निर्मिती केली आहे. मागील वर्षी २०२५ मध्ये राबविण्यात आलेल्या 'हरित धाराशिव अभियान' अंतर्गत एकाच दिवशी १७ लाख तर संपूर्ण पावसाळ्यात तब्बल ३२ लाख रोपांची यशस्वी लागवड करण्यात आली होती. या मोहिमेत सामाजिक वनीकरण विभागाने प्रमुख पुरवठादार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र,२०२५ च्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नोव्हेंबर महिन्यापर्यंत जिल्ह्यात नवीन रोपवाटिका सुरू करण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही जिल्हाधिकारी पुजार यांनी २०२६ च्या पावसाळी वृक्षलागवडीसाठी सामाजिक वनीकरण विभागास २५ लाख रोपे निर्मितीचे आव्हानात्मक उद्दिष्ट दिले होते.

### आजपासून सर्वांसाठी रोपे उपलब्ध

आजपासून १५ सप्टेंबर पर्यंत जिल्ह्यात 'वनमहोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत सामाजिक वनीकरण विभागाच्या सर्व १९ रोपवाटिकांमधून नागरिक, सामाजिक संस्था तसेच शासकीय कार्यालयांना अत्यंत किफायतशीर शासकीय दरात रोपे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक वनीकरण, विभागाने केले आहे.



### स्थानिक तंत्रज्ञानाच्या बळावर यश

नोव्हेंबरपर्यंत निसर्गाची साथ नसतानाही सामाजिक वनीकरण विभागाने कल्पकता आणि स्थानिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून हे आव्हान यशस्वीपणे पेलले. बियांची उगवण क्षमता वाढविण्यासाठी विविध अभिनव प्रयोग करण्यात आले. यामध्ये स्थानिक स्तरावर छोटे पॉली हाऊस उभारणे, रोपांच्या पिशव्यांमध्ये आवश्यक उष्णता निर्माण व्हावी यासाठी कोंबडी खताचा वापर करणे, तसेच मातीच्या मिश्रणात विशिष्ट खतांचा समावेश करून उगवण क्षमता वाढविणे अशा उपाययोजनांचा समावेश होता.या प्रयोगांमुळे विभागाने केवळ २५ लाखांचे उद्दिष्ट पूर्ण केले नाही,तर ते मागे टाकत ३५ लाखांहून अधिक गुणवत्तापूर्ण रोपे तयार करण्याचा विक्रम साधला आहे.

### हरित धाराशिव उपक्रमात सहभागी व्हा

नागरिकांनी यंदाच्या पावसाळ्यात वनमहोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होत वृक्षलागवडीच्या चळवळीत योगदान द्यावे. हरित धाराशिव अभियानामुळे जिल्ह्यात केवळ वृक्षसंवर्धनालाच चालना मिळणार नसून पर्यावरण संतुलन, जैवविविधता संवर्धन आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हरितवारसानिर्माणकरण्याच्यादिशेनेहीएकमोठेपाऊलउचललेजातआहे. या उपक्रमात सर्व नागरिकांनी आणि सेवाभावी संस्थांनी सहभागी व्हावे.

**कीर्ती किरण पुजार**
**जिल्हाधिकारी, धाराशिव.**

### ६० हून अधिक स्थानिक व दुर्मिळ प्रजातींचा समावेश

सामाजिक वनीकरण विभागाच्या अखत्यारीतील सर्व तालुक्यांमध्ये एकूण १९ रोपवाटिका कार्यरत आहेत. प्रत्येक तालुक्याच्या भौगोलिक आणि पर्यावरणीय गरजा लक्षात घेऊन येथे रोपांची निर्मिती करण्यात आली आहे. कडुनिंब, चिंच, पिंपळ, वड यांसह ६० पेक्षा अधिक स्थानिक वृक्षप्रजातींना प्राधान्य देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, निसर्गातून हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या दुर्मिळ,संकटग्रस्त व संरक्षित प्रजातींच्या रोपांची निर्मितीही अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आली असून, जैवविविधतेच्या संवर्धनासाठी हा महत्त्वाचा उपक्रम ठरत आहे.




# दिवस पहिला शाळेचा, ध्यास धरावा शिक्षणाचा

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.





नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे १५ जून २०२६ रोजी सुरू होत आहे. शाळा आरंभाच्या दिवशी प्रत्येक गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे उत्साही वातावरणात गुलाब पुष्प देऊन जंगी स्वागत करण्यात येणार आहे. प्रभातफेरी काढून शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे.पहिली ते आठवीच्या वर्गातील सर्व मुलांमुलींना पाठ्यपुस्तकाचे आणि गणवेशाचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिली वर्गातील विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन ते संग्रही ठेवले जाणार आहेत.दुपारच्या सुट्टीत शालेय पोषण आहारात विद्यार्थ्यांना गोड पदार्थ दिला जाणार आहे.

अशाप्रकारे प्रत्येक शाळेत पहिल्या दिवशी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत आणि पहिल्या दिवसापासून अभ्यासक्रम शिकवायला प्रारंभ केला जाणार आहे.नवीन शैक्षणिक वर्ष हे विद्यार्थ्यांना नवी उमेद व अभ्यास करण्याची प्रेरणा देणारे असते.जरी तो शाळेचा पहिला दिवस असला तरीही तो दिवस शिक्षणाची कास व ध्यास धरण्याची प्रेरणा देण्याचे काम करतो. एकेकाळी प्रत्येक गावात,समाजात व शाळेत चांगले शैक्षणिक वातावरण होते.त्या चांगल्या व निकोप शैक्षणिक वातावरणात अनेक पिढ्यांनी एकाग्रतेने शिक्षण शिकून जीवनाचे ध्येय गाठले व त्यामुळे त्यांच्या जीवनाचे सोने झाले आहे.नवीन शैक्षणिक वर्षात नवीन वर्ग, नवीन मित्र,नवीन पुस्तके,नवीन कपडे असायचे आणि नवीन अभ्यासक्रम असायचा.सगळं कसं नवनवीन असायचे.त्यामुळे मन हरकून जायचे आणि मन लावून शिक्षण शिकण्याची प्रेरणा मिळायची.

आजचा काळ हा माहिती तंत्रज्ञानाचा काळ आहे. संगणक,लॅपटॉप,मोबाईल आणि एआय तंत्रज्ञान यांनी मानवी जीवनात अमुलाग्र बदल केला आहे. हे तंत्रज्ञान म्हणजे मानव जातीला लाभलेले एक वरदानच आहे म्हटले तर वावगे ठरणार नाही. याचा सदुपयोग करून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण शिकता येईल,जीवनात अमुलाग्र बदल करता येईल आणि जीवनाचे सोने करून घेता येईल. पण नवीन पिढीचे दुर्दैव असे की मोबाईल आणि संगणकाचा सदुपयोग करण्याऐवजी दुरूपयोग जास्त केला जात आहे.वाईट संगतीत राहिल्याने वाईट कृत्ये केली जात आहेत.शिक्षण एकाग्रतेने शिकण्याच्या ऐवजी थातूर मातूर व दुर्लक्षितपणे शिक्षणाचे धडे गिरवले जात आहेत.असे शिक्षण कुचकामी ठरते आणि जीवनाला दिशाहीन करते.

म्हणून शिक्षण शिकायचे तर चांगल्या पद्धतीने शिक्षण शिकावे.भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पद्धतीने उच्च शिक्षणाचे शिखर गाठले आणि स्वतःचा आदर्श निर्माण केला त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी विद्याव्यासंग जपला पाहिजे .ते संपूर्ण जगात आदर्श विद्यार्थी आणि ज्ञानवंत विद्यार्थी म्हणून ओळखले जातात. हा लक्षणीय आदर्श लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या दिवशी शाळेत पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता तो दिवस ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच भारताचे मिसाईल मॅन,थोर शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांचे अद्वितीय कार्य लक्षात घेऊन त्यांचा जन्म दिवस १५ ऑक्टोबर हा दिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.ही बाब अतिशय प्रेरणादायी आहे.म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांचा आदर्श घेऊन उच्च शिक्षणात प्राविण्य मिळवावे.भारतातील सर्व विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने खूप खूप शिकावे आणि स्वतःचे,आईवडिलांचे, गावाचे,शाळेचे व देशाचे नाव मोठे करावे. शाळा आरंभ दिनाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना व सर्व शिक्षकांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

## स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी महावितरणकडून मोबाईलवर पूर्वसूचना; ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण




**आरंभ मराठी । तेर**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण)च्या तेर उपविभागीय कार्यालयांतर्गत काही वीज ग्राहकांचे जुने वीजमीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम पुन्हा वेगाने सुरू झाली आहे. याअंतर्गत अनेक वीज ग्राहकांच्या मोबाईलवर मीटर बदलण्याबाबतचे पूर्वसूचनेचे संदेश झळकू लागल्याने ग्राहकांमध्ये उत्सुकतेबरोबरच संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी काही भागांत स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला विरोध झाल्यानंतर ही मोहीम काहीशी मंदावली होती. मात्र आता पुन्हा नव्याने ग्राहकांना संदेश पाठवून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे दिसून येत आहे. महावितरणकडून पाठविण्यात येणाऱ्या संदेशामध्ये भारत सरकारने १७ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेचा संदर्भ देण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित ग्राहकाचे मीटर स्मार्ट मीटर नसल्यास संदेश प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांनंतर महावितरण अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा संदेश मीटर बदलण्याबाबतची पूर्वसूचना असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. संदेशामध्ये स्मार्ट मीटरचे विविध फायदेही नमूद करण्यात आले आहेत. त्यामध्ये मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक बिलिंग, मोबाईल ॲपच्या माध्यमातून वीज वापरावर नियंत्रण व देखरेख, घरगुती ग्राहकांना सौरऊर्जा उपलब्ध असलेल्या कालावधीत प्रति युनिट ८५ पैशांची सवलत तसेच मीटर बदलण्याची प्रक्रिया पूर्णपणे मोफत असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.दरम्यान, अनेक ग्राहकांना या संदेशातील तरतुदींबाबत शंका निर्माण झाल्या आहेत. स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य आहे का, त्याचा बिलावर नेमका काय परिणाम होईल, प्रीपेड प्रणाली लागू होणार का, तसेच भविष्यातील वापर व आकारणीची पद्धत काय असेल याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. महावितरणकडून स्मार्ट मीटर हे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून ग्राहकांना अधिक पारदर्शक व अचूक सेवा मिळण्यासाठी ही योजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले जात असले तरी ग्रामीण भागातील अनेक ग्राहकांमध्ये अद्यापही संभ्रम कायम आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीबाबत महावितरणने व्यापक जनजागृती करून ग्राहकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणी ग्राहकांकडून व्यक्त होत आहे.




# मतदारसंघातील प्रश्नांचा आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांनी घेतला आढावा

### विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक, झेडपी सदस्य विकी चव्हाण यांचा सत्कार





**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघातील आगामी राजकीय रणनीती, विकासकामे आणि जनहिताच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे सदस्य तथा शिवसेना गटनेते संदेश (विकी) चव्हाण यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. बैठकीत जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सभापती आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भातील तयारीचा आढावा घेण्यात आला. शिवसेनेची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी गाव तिथे शिवसेना, घर तिथे शिवसैनिक, हे अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यंदाच्या मान्सूनबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर संभाव्य दुष्काळी परिस्थिती, पेरणीचे नियोजन, पशुधन संरक्षण, चारा उपलब्धता आणि पाणीटंचाई यांसारख्या विषयांवर विशेष चर्चा झाली. गरज भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याबरोबरच चारा छावण्यांचे आगाऊ नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदारसंघातील विविध जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांमध्ये सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेत प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देण्यात आले. अनेक गावांमधील नागरिकांनी वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तक्रारी केल्याने संबंधित महावितरण अधिकाऱ्यांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित करण्याचे आदेश आमदार डॉ.तानाजीराव सावंत यांनी दिले.बैठकीच्या निमित्ताने जिल्हा परिषद सदस्य सुनील उंदरे यांनाही वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जिल्हाप्रमुख दत्ता अण्णा साळुंखे, परंडा नगराध्यक्ष जाकिरभाई सौदागर, भूमचे माजी नगराध्यक्ष संजय नाना गाढवे, भैरवनाथ शुगर वर्क्सचे व्हाईस चेअरमन केशव सावंत, रामचंद्र घोगरे आदी उपस्थित होते.

# मुरुड नगर परिषद प्रस्तावावर नवा वाद

### अकृषी रोजगार ४५ टक्के दाखवला, पण आकडेवारीच गायब; तहसीलदारांच्या अहवालावर प्रश्नचिन्ह

**आरंभ मराठी । मुरूड**

मुरुड ग्रामपंचायतीचे नगर परिषदेमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेत अकृषी रोजगाराच्या टक्केवारीबाबत तहसीलदारांनी सादर केलेल्या अहवालावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तहसीलदार तांदळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अहवालात मुरुड येथील अकृषी रोजगाराचे प्रमाण ४५ टक्के असल्याचे नमूद केले आहे. मात्र या टक्केवारीमागील कोणतीही आधारभूत आकडेवारी, सर्वेक्षणाचा तपशील अथवा गणनेची पद्धत दिलेली नसल्याने या अहवालाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मुरुड नगर परिषद संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष जयदीप राजाराम सुरवसे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनात या अहवालातील माहिती अपूर्ण, मोघम आणि दिशाभूलकरणारी असल्याचा आरोप केला आहे. त्यांनी नमूद केले की, नगर परिषद स्थापनेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आमदार रमेश कराड यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे मुरुडला नगर परिषदेचा दर्जा देण्याची मागणी केली होती. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने अकृषी रोजगाराचे सविस्तर सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, तहसीलदारांनी सादर केलेल्या अहवालात अकृषी रोजगाराचे प्रमाण ४५ टक्के असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी एकूण मजूर संख्या, कृषी व अकृषी क्षेत्रातील कामगारांची स्वतंत्र आकडेवारी, सर्वेक्षणाचा आधार किंवा गणनेची पद्धत यांचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे हा आकडा नेमका कोणत्या निकषांवर निश्चित करण्यात आला, याबाबत शंका उपस्थित होत आहेत. संघर्ष कृती समितीच्या मते, मुरुड हे शिक्षण, व्यापार, सेवा क्षेत्र, उद्योगधंदे तसेच विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे केंद्र म्हणून विकसित झालेले गाव आहे. त्यामुळे प्रत्यक्षात अकृषी रोजगाराचे प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक असण्याची शक्यता असताना अहवालात वास्तव परिस्थितीचे प्रतिबिंब दिसत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या मुरुड नगर परिषदेच्या प्राथमिक अधिसूचनेचाही संदर्भ देण्यात आला आहे. त्या वेळी दाखल झालेल्या हरकतींमध्येही अकृषी रोजगाराच्या टक्केवारीबाबत आक्षेप घेण्यात आले होते. तसेच २०१२ आणि २०१६ मध्ये शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये अकृषी रोजगाराचे प्रमाण ४० टक्के दाखविण्यात आले होते. मात्र त्या आकडेवारीलाही कोणतीही आधारभूत कागदपत्रे जोडलेली नव्हती, असा दावा समितीने केला आहे. विशेष म्हणजे, नंतर करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात अनेक शासकीय कार्यालये, व्यापारी प्रतिष्ठाने आणि सेवा क्षेत्रातील घटकांचा समावेश न केल्यामुळे अकृषी रोजगाराचे प्रमाण केवळ १६ टक्के दाखविण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये मुरुड नगर परिषदेची प्राथमिक अधिसूचना रद्द केली होती. नगर परिषद स्थापनेच्या प्रक्रियेला भविष्यात कोणताही कायदेशीर अथवा प्रशासकीय अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मुरुडमधील अकृषी रोजगाराचे नव्याने, सखोल, वस्तुनिष्ठ आणि सर्वसमावेशक सर्वेक्षण करण्यात यावे तसेच संपूर्ण आकडेवारीसह अहवाल सादर करण्याचे आदेश तहसीलदारांना द्यावेत, अशी मागणी संघर्ष कृती समितीने केली आहे.

# अप्पर विभागीय आयुक्त विजयकुमार फड यांच्या काल्याच्या कीर्तनाने तेर येथील सप्ताहाची सांगता

**आरंभ मराठी । तेर**

वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या संतश्रेष्ठ श्री संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरात अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता शनिवारी (दि.१३) छत्रपती संभाजीनगर विभागाचे अप्पर विभागीय आयुक्त विजयकुमार फड यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. संत गोरोबा काका व शिवमंदिर समितीचे प्रशासक तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त राजेंद्र कानाडे आणि निरीक्षक अतुल नळणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह सोहळ्याला ६ जूनपासून प्रारंभ झाला होता. या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचने, भजन व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सप्ताहभर भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. सांगता समारंभात अप्पर विभागीय आयुक्त विजयकुमार फड यांनी काल्याचे कीर्तन सादर करत भक्तांना संत साहित्य, वारकरी परंपरा आणि अध्यात्मिक जीवनमूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक दगडू जाधवर, संत गोरोबा काका व शिवमंदिर समितीचे व्यवस्थापक साहेबराव सौदागर तसेच राजाभाऊ आंधळे, विजयकुमार खांडेकर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादाचे वितरण झाल्यानंतर भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता करण्यात आली. सप्ताहभर चाललेल्या धार्मिक कार्यक्रमांमुळे मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता.



हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# लोकसहभागाची ताकद; सोनेगावची झेडपी शाळा बनली 3D बोलकी

## सरकारी निधीशिवाय गावकऱ्यांनी घडवला कायापालट; आपली मुले आपल्या गावातल्या शाळेतच ठेवण्याचा निर्धार

**धाराशिव : सरकारी शाळांबाबत उदासीनतेची चर्चा होत असताना धाराशिव तालुक्यातील सोनेगावने मात्र लोकसहभागाच्या बळावर वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. गावातील तरुणांच्या पुढाकारातून आणि ग्रामस्थांच्या आर्थिक सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे रूपडे पूर्णपणे बदलले असून ती आता '3D बोलकी शाळा' म्हणून पंचक्रोशीत चर्चेचा विषय ठरली आहे. गावातील युवा उद्योजक किरण गोफणे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला. गावातील तरुणांनी वर्गणी गोळा करून शाळेची आकर्षक रंगरंगोटी केली. विशेष म्हणजे या कामासाठी कोणत्याही सरकारी निधीचा वापर करण्यात आलेला नाही. गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने मदतीचा हात पुढे करत शाळेच्या विकासात थेट सहभाग नोंदवला. शाळेच्या भिंतींवर 3D पद्धतीने रेखाटलेली चित्रे, शैक्षणिक माहिती आणि प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत.**









'मुलगा-मुलगी एकसमान', 'मुलगी शिकली प्रगती झाली' आणि 'शाळेला गावाचा आधार, गावाला शाळेचा अभिमान' यांसारखे संदेश सामाजिक समतेचा आणि शिक्षणाचा विचार प्रभावीपणे मांडतात. त्यामुळे शाळेचे वातावरण अधिक बालस्नेही आणि आकर्षक बनले आहे. सोमवारपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा शाळेकडे ओढा वाढावा, अभ्यासात रुची निर्माण व्हावी आणि गावातील पालकांनी खाजगी शाळांऐवजी स्थानिक जिल्हा परिषद शाळेवर विश्वास ठेवावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गावात पहिली ते आठवीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. शाळेची गुणवत्ता आणि पटसंख्या वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करण्याची गरज आहे. आपली मुले आपल्या शाळेतच शिकली पाहिजेत,असे आवाहन किरण गोफणे यांनी केले. लोकसहभागातून सरकारी शाळेचा चेहरामोहरा बदलू शकतो, हे सोनेगावने कृतीतून दाखवून दिले आहे. इच्छाशक्ती, सामाजिक बांधिलकी आणि गावाच्या विकासाची तळमळ असेल तर सरकारी शाळाही खाजगी शाळांपेक्षा कमी नाहीत, हे या उपक्रमाने सिद्ध केले आहे.

### गावातली मुले गावातल्याच शाळेत शिकावीत

लोकसहभागातून शाळेचा विकास शक्य आहे. आता गावातील प्रत्येक मुलाने आपल्या शाळेत शिकावे, हेच खरे या उपक्रमाचे यश असेल.

**किरण गोफणे, युवा उद्योजक**

---

## RAWE कार्यक्रमांतर्गत वरुडा येथे ग्रामभेट; कृषीदूतांनी शेतकऱ्यांशी साधला संवाद

**आरंभ मराठी । धाराशिव**




बी.एस्सी. कृषी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या RAWE (Rural Agricultural Work Experience) कार्यक्रमांतर्गत वरुडा येथे ग्रामभेट व परिचय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, वरुडा येथे भेट देऊन सरपंच, ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. RAWE कार्यक्रमाची उद्दिष्टे, ग्रामीण कृषी विकासामधील विद्यार्थ्यांची भूमिका तसेच आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध कृषीविषयक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कृषी महाविद्यालयातील कृषीदूत शंतनू शिंदे, कनिष्क सोनवणे, महेश सावंत, कार्तिक पवार, कृष्णा पाटील, सागर सलगरे, संकेत पाटील आणि अभिषेक पाटील यांनी गावातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून RAWE कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी, स्थानिक शेतीपद्धती आणि कृषीविषयक गरजा जाणून घेतल्या.

या उपक्रमासाठी प्रा. शेटे सर आणि प्रा. शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली RAWE कार्यक्रमास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला.

## मुखदर्शनाच्या नावाखाली भाविकांची फसवणूक

**तुळजापूर** :- श्री तुळजाभवानी मंदिरात मुखदर्शन करून देण्याच्या नावाखाली भाविकांकडून पैसे उकळून फसवणूक केल्याप्रकरणी तुळजापूर पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अभिषेक आशोकराव साळुंके व हर्षल विनोद चव्हाण (दोघेही रा. तुळजापूर) यांनी संगनमत करून हा प्रकार केल्याचा आरोप आहे. दिनांक 31 मे 2026 रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास श्री तुळजाभवानी मंदिरातील दर्शन मंडपाच्या तिसऱ्या मजल्यावर हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादी श्रीकांत उद्धव पवार (वय 30, रा. दयानंद नगर, तुळजापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मंदिर प्रशासनाने अभिषेक साळुंके यांना मंदिर प्रवेशबंदी केली असतानाही त्यांनी संबंधित बंदी आदेशाचे उल्लंघन केले. तसेच भाविकांकडून पैसे घेऊन त्यांना मुखदर्शनासाठी सोडल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, श्री तुळजाभवानी मंदिरामध्ये मुखदर्शनाची सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध असताना आरोपींनी भाविकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी श्रीकांत पवार यांनी 12 जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 223, 318(4) व 3(5) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## समाज विकास संस्था व नाम फाउंडेशनकडून ६६० विधवा-परित्यक्ता शेतकरी महिलांना बियाणे वाटप

**आरंभ मराठी । उमरगा**




शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी समाज विकास संस्था आणि नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा तालुक्यातील ६६० विधवा व परित्यक्ता शेतकरी महिलांना बियाण्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांना खरीप हंगामासाठी मदत मिळाली असून शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. समाज विकास संस्था आणि नाम फाउंडेशन यांच्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध जिल्हे, तालुके आणि गावांमध्ये विधवा व परित्यक्ता शेतकरी महिलांना विविध प्रकारच्या बियाण्यांचे वाटप करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून उमरगा तालुक्यात हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला माजी अभियंता किसान बाबरे, अमेरिकेत वास्तव्यास असलेले गंगाधर जगदाळे, समाज विकास संस्थेचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ तसेच आणिक फायनान्शिअल सर्व्हिसेसचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी किसान बाबरे, गंगाधर जगदाळे आणि आदर्श गाव व्हताळचे सरपंच यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ज्येष्ठ समाजसेवक भूमिपुत्र वाघ म्हणाले की, शेती वाचली आणि शेती पिकली तरच समाजव्यवस्था सक्षम राहू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठीची मदत सर्वप्रथम शेताच्या बांधापर्यंत पोहोचली पाहिजे. शेतकरी सुखावला तर संपूर्ण समाज सुखावतो. सरकार, दानशूर व्यक्ती आणि स्वयंसेवी संस्थांनी बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय टाकळे, अफसाना मुल्ला, विद्या मारकड, गोविंद कामले, गणेश टाकळे, ज्ञानेश्वर पाटील, ज्योती राजपूत, सुमित भोसले आणि अनिल लवटे यांनी परिश्रम घेतले.

## मुरुम येथील शिक्षकपुत्राचा राष्ट्रीय पातळीवरील गौरव

### गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणेचा दीप ठरले डॉ. शिवाजीराव शिंदे

**आरंभ मराठी । मुरुम**



मुरूम शहरातील स्मृतीशेष सिद्राम गंगाराम शिंदे गुरुजी यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त वीरशैव संत कक्कया समाज व मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हरियाणा राज्यातील पानिपत येथे भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालय विभागात प्रादेशिक व्यवस्थापक म्हणून सेवा बजावलेले सेवानिवृत्त डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या सेवापूर्ती सत्कारासह गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन रविवारी (ता. १४) रोजी श्रीराम मंगल कार्यालयात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा-लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले होते. सत्कारमूर्ती म्हणून डॉ. शिवाजीराव शिंदे यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राम कांबळे, वीरशैव संत कक्कया समाज धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्तू कटकधोंड, ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शरणाप्पा मुदकण्णा, मनोहर शिंदे, बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखाधिकारी सचिता चव्हाण, मेजर विजयकुमार शिंदे, व्हीव्हीए फाउंडेशनच्या संचालिका रुपाली शिंदे, प्रतिक शिंदे, ऐश्वर्या शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रमोद कुलकर्णी, राम कांबळे, दत्तू कटकधोंड व प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. शिवाजी शिंदे, पत्नी रूपाली शिंदे व कुटुंबीय यांचा मानपत्र, शाल, बुके संपूर्ण आहेर उपचार देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला. वीरशैव संत कक्कय्या समाज बांधव व मित्र परिवारामार्फत डॉ. शिंदे व परिवाराचा सत्कार करण्यात आला. यावेळी वसंत शिंदे, खंडू शिंदे, गिरजप्पा कावळे, धनराज शिंदे, ज्योतीराम शिंदे, प्रवीण शिंदे, श्रावण कटके, सचिन शिंदे, रेवण कटके, बाबू शिंदे, मधुकर शिंदे, जोतीराम रकमाजी शिंदे, राजेंद्र कटके, वैभव कटके, अमोल कटके, सुलोचना शिंदे, जयश्री कावळे, महादेवी शिंदे, रेशमा शिंदे, साक्षी शिंदे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कमलाकर मोटे यांनी केले. संतोष पवार यांनी सूत्रसंचालन तर गंगाधर शिंदे यांनी आभार मानले. यावेळी दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## राज ठाकरेंच्या वाढदिवसाला मनसेकडून ५९ वृक्षांचे रोपण



**धाराशिव** :- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या ५९ व्या वाढदिवसानिमित्त धाराशिव शहरात मनसेच्या वतीने विविध ठिकाणी ५९ वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा उपक्रम राबविण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे आयोजित कार्यक्रमात रायझिंग क्रिकेट अकॅडमीचे संयोजक रामु हिरापुरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. मनसेचे जिल्हा सचिव दादा कांबळे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.यावेळी मनसेचे धाराशिव तालुकाध्यक्ष सलिम औटी, शहराध्यक्ष नितेश जाधव, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष राहुल बचाटे, शिक्षक सेनेचे नेते बबनराव वाघमारे, दत्ता जाधव तसेच रायझिंग क्रिकेट अकॅडमीचे खेळाडू आणि मनसे पदाधिकारी उपस्थित होते.राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या वृक्षारोपण मोहिमेद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचाही निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

---

आरंभ मराठी

## ग्रामीण भागात खासगी शाळांकडून विद्यार्थ्यांची पळवापळवी

# विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी चुरस

**आरंभ मराठी । तामलवाडी**



ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी मोठी स्पर्धा निर्माण झाली असून काही खासगी इंग्रजी माध्यम शाळांकडून विद्यार्थ्यांची पळवापळवी केली जात असल्याचा आरोप केला जात आहे. प्रवेशसंख्या वाढविण्याच्या उद्देशाने काही शाळांकडून पालकांना विविध आमिषे दाखवून विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित केले जात असल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. काही शाळांचे प्रतिनिधी थेट गावोगावी जाऊन पालकांच्या भेटी घेत आहेत. विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, वाहतूक सुविधा, फीमध्ये सवलत तसेच इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली विविध आकर्षक आश्वासने दिली जात आहेत. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत संभ्रमावस्थेत असून विद्यार्थ्यांचे एका शाळेतून दुसऱ्या शाळेत स्थलांतर वाढत असल्याचे दिसून येत आहे. शाळांमध्ये निरोगी स्पर्धा असणे आवश्यक असले तरी विद्यार्थ्यांची पळवापळवी करणे किंवा इतर शाळांची बदनामी करून प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करणे हे शिक्षणाच्या मूल्यांना धरून नसल्याचे मत व्यक्त केले जात आहे. काही ठिकाणी प्रवेशासाठी एजंट व्यक्तींचा वापर होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व मराठी माध्यमाच्या शाळांवर होत असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. आधीच घटती पटसंख्या, शिक्षकांची कमतरता आणि संसाधनांचा अभाव अशा समस्यांशी झुंज देणाऱ्या शाळांसमोर विद्यार्थ्यांची संख्या आणखी कमी होण्याचे संकट उभे राहिले आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने अशा प्रकारांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, तसेच विद्यार्थी व पालकांची दिशाभूल करणाऱ्या संस्थांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शिक्षक संघटना, ग्रामस्थ आणि पालकांकडून होत आहे. शिक्षण हे सेवा आणि संस्काराचे क्षेत्र असून केवळ प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांचा वापर स्पर्धेचे साधन म्हणून होऊ नये, अशी अपेक्षा सुजाण पालकांनी व्यक्त केली आहे.

## एल निनोच्या सावटात शेतकऱ्यांना शास्त्रोक्त शेतीचा मंत्र

### बर्माचीवाडी, वाघोली व गौर येथे खरीपपूर्व मार्गदर्शन

**आरंभ मराठी । मोहा**



आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बर्माचीवाडी, वाघोली व गौर येथे कृषी विभागाच्या वतीने खरीपपूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बदलत्या हवामान परिस्थितीमुळे शेतीसमोर निर्माण होणारी आव्हाने, एल निनोचा संभाव्य परिणाम, पीक नियोजन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर याबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकींना परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना कृषी अधिकाऱ्यांनी एल निनो या जागतिक हवामान घटनेमुळे पावसाच्या वितरणात अनियमितता निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली. काही भागांमध्ये कमी पाऊस तर काही ठिकाणी अतिवृष्टीची परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पीक नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी पेरणीपूर्व मशागत, तण व्यवस्थापन, जलसंधारण उपाययोजना, पीक विमा, पीक विविधीकरण तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याबाबत माहिती देण्यात आली. पुरेसा ओलावा झाल्यानंतरच पेरणी करण्याचा सल्लाही शेतकऱ्यांना देण्यात आला. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील विविध समस्यांबाबत प्रश्न उपस्थित केले. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन करत योग्य तांत्रिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपकृषी अधिकारी सुजाता गोरे, सहाय्यक कृषी अधिकारी संजय बनसोडे, श्रीकृष्ण नाईकवाडे आणि कल्पना पाटील उपस्थित होत्या. तसेच गावातील प्रगतशील शेतकरी, कृषीप्रेमी नागरिक आणि कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# आठ कोटींच्या तुळजापूर बस स्थानकाची दुरावस्था; ना पिण्याचे पाणी, ना स्वच्छतागृहात स्वच्छता

## तीर्थक्षेत्रातच सुविधांचा अभाव; तुळजापूर बस स्थानकातील गैरसोयींमुळे भाविक व प्रवासी त्रस्त

सूरज बागल । आरंभ मराठी

**तुळजापूर - तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे गतवर्षी तब्बल आठ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या नवीन बस स्थानकात प्रवाशांना आजही मूलभूत सुविधांसाठी वणवण करावी लागत आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, स्वच्छतागृहांची अत्यंत दयनीय अवस्था, बंद पडलेले पंखे आणि निष्क्रिय सीसीटीव्ही कॅमेरे यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चूनही अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने नागरिक आणि भाविकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.**

तुळजापूर शहरातील लातूर रोड चौक परिसरात असलेले जुने बस स्थानक पाडून आधुनिक सुविधांनी युक्त नवीन बस स्थानक उभारण्यात आले. मात्र सुरुवातीपासूनच हे बस स्थानक विविध कारणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले. बांधकामाच्या दर्जाबाबत तसेच नियोजनातील त्रुटींविषयी अनेक तक्रारी करण्यात आल्या. विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी आंदोलने करून प्रश्न उपस्थित केले, परंतु त्यानंतरही परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसून येत नाही. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असतानाही बस स्थानकात प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही समाधानकारक व्यवस्था उपलब्ध नाही. दूरदूरहून येणाऱ्या भाविकांना आणि प्रवाशांना यामुळे मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. स्थानकात बसविण्यात आलेले पंखे देखील अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असून ते केवळ शोभेची वस्तू ठरत असल्याची भावना प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. तुळजापूर हे राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. अनेक भाविकांसाठी बस हेच प्रमुख वाहतूक साधन असल्याने बस



### सीसीटीव्ही कॅमेरे बंद; चोरीच्या घटनांत वाढ

बस स्थानक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात असून बंद पडलेली सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानकावर मोठी गर्दी असते. मात्र येथे आल्यानंतर मूलभूत सुविधा मिळत नसल्याने भाविक आणि प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे राज्याचे परिवहन मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या तुळजापूरमध्येच अशी परिस्थिती असल्याने आता या प्रश्नाकडे पालकमंत्री लक्ष देणार का, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

### मोफत स्वच्छतागृह, पण पाण्याअभावी घाणीचे साम्राज्य

एक जूनपासून बस स्थानकातील स्वच्छतागृह वापरासाठी मोफत करण्यात आले आहे. मात्र स्वच्छतागृहांमध्ये पाण्याची उपलब्धता नसल्याने तेथे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण झाली आहे. घाणीचे साम्राज्य पसरल्याने प्रवाशांना स्वच्छतागृह वापरणेही त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

### बस स्थानकाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्ह

आठ कोटी रुपयांचा निधी खर्चून उभारण्यात आलेले हे बस स्थानक सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरले आहे. स्थानकाच्या मागील बाजूस मोठी जागा रिकामी ठेवण्यात आल्याने प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध जागा तुलनेने कमी पडत असल्याची टीका केली जाते. तसेच काही संरक्षण भिंती जुन्या भिंतींनाच रंगरंगोटी करून उभारल्याचा आरोपही करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### कारवाईबाबत अद्यापही अनिश्चितता

बस स्थानकाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे काम झाल्याच्या तक्रारी अनेक वेळा करण्यात आल्या आहेत. मात्र या तक्रारींवर नेमकी काय कारवाई झाली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच प्रवाशांना तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिक व भाविकांकडून जोर धरत आहे.

# रुपामाता फाऊंडेशन व रुपामाता अर्बनकडून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा सन्मान



आरंभ मराठी । येडशी

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून आदर्श निर्माण करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करणे ही समाजाभिमुख सहकाराची परंपरा जपत रुपामाता फाऊंडेशन तसेच रुपामाता अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव, शाखा येडशी यांच्या वतीने सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. रुपामाता उद्योग समूह व रुपामाता अर्बन/मल्टीस्टेटचे संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड पाटील तसेच कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड पाटील यांच्या सूचनेनुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले व मुख्य प्रशासकीय अधिकारी विशाल गुंड पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शामकुमार नलावडे (निवृत्त जिल्हा परिषद शिक्षक), गोपाळ इंगळे (निवृत्त रेल्वे पोलीस अधिकारी), उद्धव क्षीरसागर (निवृत्त अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया) तसेच ऋषिकेश मोरे (भारतीय लष्कर भरती) यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शाखा व्यवस्थापक सोमेश्वर शिंदे यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. तसेच कर्मचारी वर्गातील प्रमोद शिंदे, शुभम चौगुले व श्वेता जाधव यांनीही मान्यवरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या.

# भूम शहरात डुकरांचा सुळसुळाट; कचरा व्यवस्थापन कोलमडल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

आरंभ मराठी । भूम

भूम शहरात वाढत्या घाणीमुळे आणि कचरा व्यवस्थापनाच्या ढिसाळ स्थितीमुळे डुकरांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील विविध रस्ते, गल्ली-बोळ आणि सार्वजनिक ठिकाणी डुकरांचे कळप मुक्तपणे फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच शहरात घाणीचे साम्राज्य वाढू लागले आहे. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने आणि स्वच्छतेच्या कामांकडे दुर्लक्ष होत असल्याने डुकरांची संख्या वाढत आहे. यामुळे दुर्गंधी पसरत असून संसर्गजन्य



आजारांचा धोका निर्माण झाला आहे. भूम नगरपालिकेतील सत्ताधारी आणि विरोधी गटांमधील राजकीय संघर्षाचा फटका शहराच्या विकासकामांना बसत आहे. नगराध्यक्षपद सत्ताधाऱ्यांकडे असताना, बहुसंख्य नगरसेवक जनशक्ती नगर विकास आघाडीचे असल्याने विकासकामांबाबत समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. याचा परिणाम कचरा व्यवस्थापनासह इतर मूलभूत नागरी सुविधांवर होत आहे. नगरपालिकेकडे स्वच्छता कामांसाठी आवश्यक मनुष्यबळाची कमतरता असल्याचेही समोर येत आहे. पावसाळ्यात नदी-नाले आणि गटारींची स्वच्छता करणे आवश्यक असताना त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. काही वर्षांपूर्वी शहरातील डुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. मात्र, सध्या पुन्हा एकदा डुकरांचे कळप मोठ्या प्रमाणावर शहरात फिरताना दिसत आहेत. डुकरांच्या वाढत्या वावरामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी वाढत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने राजकारण बाजूला ठेवून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि डुकरांच्या बंदोबस्तासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून करण्यात येत आहे.

# वालवड गटातील विद्यार्थ्यांना जयश्रीताई काळे यांच्याकडून मोफत शालेय साहित्याचे वाटप

आरंभ मराठी । भूम

धाराशिव जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या जयश्रीताई बालाजी काळे यांच्या सौजन्याने वालवड जिल्हा परिषद गटातील सर्व जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मोफत शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, रजिस्टर, कंपास पेटी, पेन, पेन्सिल आदी आवश्यक साहित्य दिले जाणार आहे. वालवड, वाल्हा, गणेगाव, पाटसांगवी, राळेसांगवी, हिवर्डा, चुंबळी, कृष्णापूर, कासारी, भोगलगाव, सामनगाव, वरूड, चिंचोली, नवलगाव, रामेश्वर आदी गावांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य सहज उपलब्ध करून देणे व पालकांवरील आर्थिक भार कमी करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मंत्री तथा आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या सूचनेनुसार आणि दत्ता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांकडून त्याचे स्वागत होत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## AI मुळे बदलतेय शिक्षणाची दिशा; विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, कौशल्य आणि करिअरच्या नव्या वाटा खुल्या

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शिक्षण क्षेत्रात नवे पर्व, संधींसोबत आव्हानांचाही करावा लागणार सामना

शाम जाधवर । आरंभ मराठी

**कळंब - तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) आज प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. शिक्षण क्षेत्रही याला अपवाद राहिलेले नाही. विद्यार्थ्यांच्या अभ्यासपद्धतीपासून ते करिअरच्या संधींपर्यंत AI मुळे मोठे बदल होत असून, भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचा चेहरामोहराच बदलणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.**

पूर्वी विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाची माहिती मिळविण्यासाठी पुस्तके, ग्रंथालये किंवा शिक्षकांवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र आज AI आधारित साधनांमुळे काही सेकंदांत माहिती उपलब्ध होत आहे. प्रश्नांची उत्तरे, प्रकल्प, सादरीकरणे, भाषांतर, लेखन, गणिती उदाहरणे सोडविणे यासारखी अनेक कामे AI सहज करू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचत असून शिकण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होत आहे. AI मुळे वैयक्तिक शिक्षणालाही चालना मिळत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, आवड आणि शिकण्याचा वेग वेगळा असतो.

AI आधारित प्रणाली विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अभ्यास साहित्य उपलब्ध करून देऊ शकतात. त्यामुळे शिक्षण अधिक प्रभावी आणि परिणामकारक बनण्याची शक्यता आहे. शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, भविष्यातील शिक्षण हे केवळ पाठांतरावर आधारित न राहता कौशल्याधारित होणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार मार्गदर्शन, अभ्यासातील कमकुवत बाजू ओळखणे, प्रगतीचा मागोवा घेणे आणि विषयांचे सखोल आकलन करून देण्यासाठी AI महत्त्वाची भूमिका बजावू शकते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्याची क्षमता AI मध्ये असल्याने शिक्षणातील दरी कमी होण्यास मदत होऊ शकते.

तथापि, AI च्या वाढत्या वापरामुळे काही चिंता देखील व्यक्त केल्या जात आहेत. अनेक विद्यार्थी गृहपाठ, निबंध किंवा प्रकल्प पूर्णपणे AI च्या मदतीने तयार करत असल्याने त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि विचारशक्तीवर परिणाम होण्याची भीती आहे. तसेच माहितीची पडताळणी न करता तिचा वापर केल्यास चुकीची माहितीही पसरू शकते. तज्ज्ञांच्या मते, AI ला पर्याय म्हणून नव्हे तर सहाय्यक म्हणून वापरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी AI कडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून स्वतःची मते तयार करणे महत्त्वाचे ठरेल. भविष्यात केवळ माहिती पाठ करणाऱ्यांपेक्षा समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता, संवाद कौशल्य आणि तांत्रिक ज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांना अधिक मागणी असेल. AI हे भविष्यातील शिक्षणाचे महत्त्वाचे साधन असले तरी मानवी बुद्धिमत्ता, नैतिक मूल्ये आणि सर्जनशील विचार यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. त्यामुळे AI चा योग्य आणि जबाबदारीने वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते वरदान ठरू शकते.




### AI मुळे विद्यार्थ्यांना होणारे फायदे

**जलद आणि सुलभ माहिती उपलब्ध होते.**
**वैयक्तिक अभ्यास नियोजन करता येते.**
**भाषांतर आणि लेखनात मदत होते.**
**तांत्रिक कौशल्यांचा विकास होतो.**
**नवीन करिअर संधी उपलब्ध होतात.**

### AI मुळे अभ्यासात निर्माण होणारी आव्हाने

अभ्यासातील स्वावलंबन कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
चुकीच्या माहितीचा धोका वाढतो.
विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर परिणाम होतो.
अभ्यासाचे नियोजन तंत्रज्ञानावर अवलंबून ठरते.

### रोजगाराच्या क्षेत्रातही AI मुळे मोठे बदल

रोजगाराच्या क्षेत्रातही AI मुळे मोठे बदल होण्याची शक्यता आहे. काही पारंपरिक नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार असले तरी डेटा सायन्स, मशीन लर्निंग, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा आणि AI व्यवस्थापन यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे गरजेचे ठरणार आहे.

“AI हे विद्यार्थ्यांचे भविष्य बदलणारे साधन आहे; मात्र त्याचा वापर विचारपूर्वक आणि जबाबदारीने करणे ही काळाची गरज आहे.

**धनंजय जेवळीकर**
**एमकेसीएल समन्वयक, धाराशिव**

# उमरगा तालुक्यात बीज प्रक्रिया व उगवण क्षमता चाचणीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन




आरंभ मराठी । उमरगा

यंदाच्या खरीप हंगामाच्या अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरगा यांच्या वतीने तालुक्यातील विविध गावांमध्ये बियाण्यांची उगवण क्षमता चाचणी, बीज प्रक्रिया, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर योग्य पीक नियोजन तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांची माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी रुंद वरंबा-सरी (BBF) पद्धत, टोकन पेरणी पद्धत, आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा तसेच कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. याशिवाय प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, याबाबतही मार्गदर्शन केले जात आहे. तालुक्यातील आष्टा, मळगी, मळगेवाडी, गुरुवाडी, पारसखेडा, दगड धानोरा आणि आलूर येथे कृषी विभागामार्फत खरीपपूर्व शेतकरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. याच अनुषंगाने आष्टा येथे हंगामपूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली.या प्रसंगी सहाय्यक कृषी अधिकारी अतुल गायकवाड, प्रगतशील शेतकरी मिथुन मोरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशनकडून कळंब तालुक्यात सोयाबीन बियाण्यांचे वाटप

आरंभ मराठी

नाम फाउंडेश
आयोजित ‘ब
बियाणे वाटप
हासेगाव (के
कार्यालय परि




कार्यक्रमाला कळंब व वाशी तालुक्यातील महिला शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती

## जेकेकूर येथे ‘खेत बचाव अभियान’ अंतर्गत खरीप जनजागृती

आरंभ मराठी / नारंगवाडी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा तालुक्यातील जेकेकूर येथे ‘खेत बचाव अभियान’ अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी सखी तसेच बळीराजा नैसर्गिक शेतकरी गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. भगवान

